महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२०-२१/२०२१/ १७८२ दिनांक : ०६.०४.२०२१

**परिपत्रक:**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदवी, पदव्युत्तर पदवी, अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/
व्यवस्थापनशास्त्र/वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग

**विषय : PMSSS अंतर्गत विद्यार्थ्यांची नोंदणी, प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश अपलोड करण्याचे व प्रवर्ग बदल शुल्क अदा करण्याकरीता लिंक उपलब्ध करुन देण्याबाबत..**

संदर्भ : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचा दिनांक ०५.०४.२०२१ रोजीचा ई-मेलवरील संदेश.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भीय ई-मेलद्वारे प्राप्त संदेशानुसार सर्व संस्थांना खालीलप्रमाणे कळविण्यात सूचित करण्यात येते की,

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये काही संस्थांकडून PMSSS अंतर्गत विद्यार्थ्यांची नोंदणी व प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश अपलोड करण्याचे राहीले होते अशा सर्व संस्थांना दिनांक ०७.०४.२०२१ ते दिनांक १२.०४.२०२१ या कालावधीत PMSSS अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश अपलोड करण्यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
२) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर रिक्त राहीलेल्या व संस्थास्तरावरील जागा भरताना ज्या उमेदवारांनी राखीव प्रवर्गातून अर्ज केला होता परंतु त्यांनी संस्थास्तरावरील खुल्या प्रवर्गातील जागेत प्रवेश घेतला आहे, अशा सर्व उमेदवारांकडून रुपये २००/- (प्रती उमेदवार) प्रवर्ग बदल शुल्क अदा करण्याकरीता दिनांक ०७.०४.२०२१ ते दिनांक १२.०४.२०२१ या कालावधीत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

उपरोक्त १ व २ नुसार सर्व अभ्यासक्रमाबाबत दिनांक ०७.०४.२०२१ ते दिनांक १२.०४.२०२१ या कालावधीत आपल्या स्तरावरुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी तसेच अन्य कोणतीही माहिती अपलोड करण्यात येऊ नये याची दखल घेण्यात यावी.

**(एम. आर. जाधव)**
सहायक संचालक (तां)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे